पुढारी



गडहिंग्लज : 'रवळनाथ'च्या येथील सहकार सप्ताह शुभारंभ कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सुहास नाडगौंडा. शेजारी एम. एल. चौगुले, स्वरूप खारगे.

# 'रवळनाथ'च्या सहकार सप्ताहास उत्साहात प्रारंभ

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

सहकारातील सहज सुलभ अर्थपुरवठ्यामुळेच सामान्य माणसाची सामाजिक व आर्थिक पत उंचावली आहे. किंबहुना सहकार चळवळीमुळेच ग्रामीण महाराष्ट्राचा विकास झाला असून सर्वसामान्य माणसाच्या पर्यायाने देशाच्या विकासासाठी सहकाराशिवाय पर्याय नाही, असे प्रतिपादन लाचलुचपत प्रतिबंधक खात्याचे पुणे विभागाचे सेवानिवृत्त अप्पर पोलिस अधीक्षक सुहास नाडगौंडा यांनी केले.

६९ व्या अखिल भारतीय सहकार सप्ताहानिमित्त श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी, ज्ञानदीप प्रबोधिनी, इंटेंट करिअर ॲकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते. मुख्याधिकारी स्वरूप खारगे यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेच्या प्रांगणात सहकार सप्ताहनिमित्त सहकार ध्वजाचे ध्वजारोहण मुख्याधिकारी खारगे यांच्या हस्ते झाले. संस्थाध्यक्ष चौगुले यांनी मनोगत व्यक्त करून 'रवळनाथ'च्या दहा शाखांत सहकार सप्ताह साजरा होत असल्याचे स्पष्ट केले. यावेळी प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, महेश मजती, मीना रिंगणे, संदीप कागवाडे व अधिकारी, सभासद, कर्मचारी उपस्थित होते. प्रा. डॉ. दत्ता पाटील यांनी प्रास्ताविक केले. गौरी बेळगुद्री यांनी सूत्रसंचालन केले. सीईओ डी. के. मायदेव यांनी आभार मानले.

My Kolhapur Edition
Nov 15, 2022 Page No. 9
newspaper.pudhari.co.in